# अनुकंपा उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना

सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर सातारा जिल्हा परिषदेची अनुकंपा भरतीची गट क व गट ड ची तात्पुरती प्रतिक्षासुची दि. 25/08/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 17/07/2025 व ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि 31/07/2025 मधील तरतुदींनुसार ज्या उमेदवारांना गट क मधुन गट ड मध्ये समाविष्ट करणेचा विकल्प द्यावयाचा आहे त्यांनी दि. 03/09/2025 अखेर dyceogadstr@gmail.com या वेबसाईटवर किंवा समक्ष या कार्यालयास सादर करावा. सोबत गट बदलणेचा विकल्प नमुना सादर केला आहे.

सही xxx
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
सातारा जिल्हा परिषद

दि.    /    /2025

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, सातारा

विषय - प्रतिक्षासुचीचा गट बदलणेबाबत.
संदर्भ - सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील शासन निर्णय
दि. 17/07/2025

उपरोक्त विषयांस अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील शासन निर्णय दि. 17/07/2025 अन्वये अनुकंपा धारकांची गट क व गट ड ची स्वतंत्र प्रतिक्षासुची सातारा जिल्हा परिषदच्या संकेतस्थळावर दि. 25/08/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने दि. 29/08/2025 रोजी अनुकंपाधारकांचा मेळावा आयोजित करण्यात आलेला होता.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र. ) यांनी दि.01/01/2024 ते दि. 31/08/2025 अखेर रिक्त पदांची माहिती व शासन निर्णयामधील तरतुदींच्या अनुषंगाने प्रतिक्षासुचीचा गट बदलणे विषयक मार्गदर्शक सुचना दिल्या.

दि. 25/08/2025 रोजी प्रसिध्द केलेल्या प्रतिक्षासुचीमध्ये माझा अनुक्रमांक -------------असुन सातारा जिल्हा परिषदेने प्रसिध्द केलेल्या गट क गट ड मधील रिक्त पदांचे अवलोकन करता व माझा प्रतिक्षासुचीतील अनुक्रमांकाचा विचार करता सद्यस्थितीत व नजीकच्या कालावधीत मला गट क पदावर नियुक्ती मिळण्याची शक्यता दिसुन येत नाही. सद्यस्थितीत मला नोकरीची नितांत आवश्यकता असल्याने मी गट ड पदावरील नियुक्ती स्विकारण्यास तयार आहे. त्यानुसार मी श्री. / श्रीम. ------------------------------------------------------- आज दि.    /    /2025 रोजी माझे गट क च्या अनुकंपा प्रतिक्षासुचीतील नाव गट ड मधील अनुकंपा सुचीमध्ये समाविष्ट करण्यास विनंती करीत आहे. तसेच उपरोक्त शासननिर्णयाप्रमाणे गट बदलणेची मुभा ही एकदाच आहे याची मला जाणीव आहे.

माझे नावाचा गट ड मध्ये समावेश झालेनंतर देण्यात आलेल्या गट ड पदाचा स्विकार करुन मी भविष्यामध्ये खातेप्रमुख किंवा वरिष्ठ कार्यालयाकडे शैक्षणिक अर्हतेनुसार पद बदलुन मिळणेस विनंती अगर प्रस्ताव सादर करणार नाही. तसेच भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार तसेच न्यायालयात दावा दाखल करणार नाही.

दिनांक :-
ठिकाण:-

आपला /आपली विश्वासू,

स्वाक्षरी :-

(नाव :----------------------------------)